# प्रत्येकाने परिसर स्वच्छ ठेवावा : केरकर

**कुठ्ठाळी : वार्ताहर**

प्रत्येकाने आपला परिसर व पर्यावरण स्वच्छ व सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे; अन्यथा भविष्यात याचा विपरीत परिणाम आपणालाच भोगावा लागणार आहे. वेर्णा येथील स्नायडर इलेक्ट्रीकल कंपनीने चालविलेले प्रयत्न स्तुत्य असून सर्वांनी याची दखल घेणे आवश्यक आहे, असे मत मुरगावच्या नगरसेविका तारा केरकर यांनी वेर्णा येथील पर्यावरण सुरक्षा सप्ताह समारोप कार्यक्रमात व्यक्त केले.

यावेळी डॉ. वल्लभ धायमोडकर, पत्रकार सुनील शेट, कंपनीचे व्यवस्थापक सर्वेश परब, सरावणा जनार्दनन व्यासपीठावर उपस्थित होते. या सप्ताहात कंपनीतर्फे 'जागतिक पर्यावरण संवर्धन' संकल्पनेवर आधारित विबिध उपक्रम राबविण्यात आले. वेर्णा व नागोवा पंचायतीच्या सरपंच लॉरेन्सा गामा व फ्रँकी वालीस यांच्या सहकार्याने प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला. लिला टेक्नॉलॉजीचे संचालक प्रदीप सरमोकादम यांचा 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' हा कार्यक्रम झाला. सर्पमित्र अमृतसिंह यांचा 'सर्पमित्र व पर्यावरणाचे रक्षण' याबाबतचा कार्यक्रम झाला.




**वेर्णा : येथील पर्यावरण सुरक्षा सप्ताहात सहभागी तारा केरकर. डॉ. वल्लभ धायमोडकर आदी.**